Publication. Saamana
Date: 16/2/2019
Page: 5
Column: 2

सामना
शनिवार, १६ फेब्रुवारी २०१९

# अदानीचे वीज बिल कॅशलेस

## ग्राहकांना मिळणार 'इलेक्ट्रिक स्माइल'

5/2

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - कॅशलेस वीज बिल भरणाऱ्या मुंबई उपनगरातील अदानी इलेक्ट्रिसिटीच्या वीज ग्राहकांना आता इलेक्ट्रिक स्माइल रूपाने बोनस पॉइंट मिळणार आहेत. वीज बिलाच्या रकमेवरून मिळणाऱ्या या इलेक्ट्रिक स्माइलचा वापर ग्राहकांना फुड अ‍ॅण्ड ब्रेव्हरेजेस, होम फर्निशिंग, कपडे आदींच्या खरेदीसाठी करता येणार आहेत. या एका स्माइलची किंमत एक रुपया असणार आहे.

एखाद्या ग्राहकाने चेकने वीज बिल भरल्यास त्याला प्रति शंभर रुपये वीज बिलावर दोन इलेक्ट्रिक स्माइल मिळणार आहेत. तर ऑनलाइन पेमेंटसाठी तीन स्माइल मिळणार असल्याने ग्राहकाचा मोठा फायदा होणार आहे. तसेच वीज बिल तयार झाल्यानंतर सात दिवसांच्या आता बिलाचा ऑनलाइन भरणा केल्यास संबंधित ग्राहकाला चार स्माइल मिळणार असल्याचे अदानी इलेक्ट्रिसिटीने स्पष्ट केले आहे. ही सेवा सुरू करण्यासाठी अदानी कंपनीने ट्रान्झॅक्शन सोल्यूशन इंटरनॅशनल या कंपनीशी हातमिळवणी केली आहे.